 *ISSN 2277-8063*

# छत्रपती शिवाजी महाराज यांची शासनपद्धती

**प्रा.बळवंतराव कुंडलिक जाधव** सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग एन.एस.सोठी लॉ कॉलेज, सांगली

इमेल :1973jbk@gmail.com Mobile :9423206893

---

**प्रस्तावना :**

स्वराज्याचे प्रशासन चालवणारी एक राजव्यवस्था निर्माण करणे आवश्यक असल्याचे ओळखून छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्य प्रशासन व्यवस्था निर्माण केली. केवळ शत्रूला पराजित करण्याचा, गेलेला मुलुख परत मिळवण्याचा, किल्ले जिंकण्याचा हा संघर्ष नव्हता, तर प्रदेशातील शासन व्यवस्था व्यवस्थिती चालवणे आवश्यक आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज हे स्वराज्याचे सार्वभौम आणि सर्वसत्ताधारी राजे होते. ते उत्तम न्याय करायचे. न्यायदानाचे अंतिम अधिकार छत्रपतींकडेच होते. त्यामुळे छत्रपती शिवरायांनी राज्याच्या संपूर्ण प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी अष्टप्रधान मंडळ निर्माण केले होते. राज्याभिषेकाच्या पहिल्याच वर्षी छत्रपती शिवरायांनी अष्टप्रधान आणि इतर विभागप्रमुखांच्या कामकाजाचे निवेदन करणारे 'जाबताड' नावाचे सरकारी कागदपत्र बनवून घेतले व त्याप्रमाणे प्रशासनाचा कारभार सुरु केला होता. शासनव्यवस्थेत अष्टप्रधान मंडळाचे महत्व अधिक होते.कारण शिवाजी महाराज मोठ्या मोठ्या कालावधीसाठी मोहिमेवर असत,तसेच शिवाजी महाराज यांना वेगवेगळ्या प्रांतांची, किल्ल्यांची,तसेच स्वराज्याची कामगिरी पार पाडावी लागत असे. तसेच सर्वसामान्य जनतेला न्याय,त्यांचे संरक्षण,आणि त्यांची सर्व जबाबदारी, तसेच कोणावर अन्याय होऊ न देणे,परकीय सत्ते विरुध्द वेळोवेळी लढाया करून स्वराज्याची संरक्षण करण्याची जबाबदारी सांभाळावी लागत असे. त्यावेळी शासन कराभार या अष्टप्रधान मंडळामार्फत केला जात असे.

**उद्दिष्टे :**

१.शिवाजी महाराजांच्या शासन कारभार अष्टप्रधान मंडळाचा अभ्यास करणे.

२. शिवाजी महाराजांच्या शासन कारभार अष्टप्रधान मंडळाची भूमिका अभ्यासणे.

**शिवाजी महाराजांच्या शासन प्रणालीत :**

**1. अष्टप्रधान मंडळात :**

शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात अष्टप्रधान मंडळाचे महत्त्व अनन्य साधारण होते. या अष्टप्रधान मंडळात ०८ मंत्री होते. ३० विभागांत त्यांचे काम विभागलेले होते. या ३० विभागातील कामाच्या व्यवस्थापनासाठी ६०० कर्मचारी नेमण्यात आले होते.

अष्टप्रधान ही आठ मंत्र्यांची परिषद होती जी मराठा साम्राज्याचा कारभार पाहत असे. तसेच प्रशासकीय आणि सल्लागार परिषद होती.अष्टप्रधान मंडळ हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या केंद्रिय प्रशासनातील महत्वाचे अंग होते. महाराज पुण्यात आल्यानंतर त्यांनी वेळोवेळी व गरजेनुसार मंत्र्यांच्या नेमणुका केल्या आहेत. राज्याभिषेकाच्या वेळी राजांचे परिपूर्ण असं अष्टप्रधान मंडळ अस्तित्वात आले. या अष्टप्रधान मंत्रिमंडळाची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

- **पंतप्रधान (पेशवा) :** शिवाजी महाराजांच्या मंत्रिमंडळातील प्रथम क्रमांकाचे सर्वोच्च मंत्री पेशवा हे होते. पहिले पेशवा हे मोरोपंत त्रिंबक पिंगळे होते. शिवाजी महाराजांनंतर स्वराज्यावर यांचा अधिकार चालत असे. स्वराज्याच्या सर्व राज्यकारभारावर यांना देखरेख ठेवावी लागत असे. महाराजांच्या गैरहजेरीत राजाचा प्रतिनिधी या नात्याने राज्यकारभार पंतप्रधानालाच सांभाळावा लागत असे पंतप्रधानाला वार्षिक १५ हजार होन, पगार मिळत होता.
- **पंत अमात्य (मजुमदार) :** पंत अमात्य हे स्वराज्यातील सर्व महाल, परगण्यांचा एकूण जमाखर्च त्या-त्या महाल, परगण्यातील अधिकाऱ्याकडून लिहून घेऊन तो तपासून बरोबर आहे की नाही हे पाहण्याचे त्याचे काम होते. तसेच लिहून तो तपासून महाराजांसमोर सादर करावा लागत असे. मंत्रिमंडळातील पहिले पंत अमात्य रामचंद्र नीलकंठ होते. पंत अमात्यांना वार्षिक १२ हजार होन पगार होता.
- **पंत सचिव (सुरनीस) :** अण्णाजीपंत दत्तोहे शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील पहिले पंत सचिव होते. हे सर्व जाणाऱ्या येणाऱ्या पत्रव्यवहारावर लक्ष ठेवणे हे त्याचे काम होते. शिवाजी महाराजांकडून निरनिराळ्या सुभेदारांना व इतर अधिकाऱ्यांना वेळोवेळी आज्ञापत्रे पाठवली जात. प्रत्येक आज्ञापत्र खलिता जाण्यापूर्वी त्यावर पंत सचिवांना लक्ष ठेवावे लागत असे. स्वराज्याचे सर्व दफ्तर सांभाळण्याचे कामही यांच्याकडेच होते. तसेच जमीन महसुलाच्या व्यवहारावरही लक्ष ठेवावे लागत असे. पंत सचिवांना वार्षिक १० हजार होन पगार होता.
- **मंत्री (वाकनीस) :** दत्ताजीपंत त्रिंबक हे अष्टप्रधान मंडळातील पहिले वाकनीस होते. वाकनीस यांच्याकडे महाराजांच्या खाजगी कारभाराकडे लक्ष ठेवण्याचे काम असे. महाराजांची रोजनिशी ठेवणे, त्यांच्या भोजन व्यवस्थेकडे लक्ष ठेवणे, वैयक्तिक संरक्षणाकडे लक्ष पुरविणे, खाजगी, कौटुंबिक आमंत्रणे करण्याची कामे त्यांना करावी लागत. त्यांना वार्षिक १० हजार होन पगार मिळत असे.
- **सेनापती (सरनौबत) :** शिवाजी महाराजांच्या सैन्याचे घोडदळ व पायदळ हे दोन प्रमुख विभाग होते. या विभागांचा प्रमुख म्हणजे सेनापती. हंबीरराव मोहिते हे पहिले सेनापती होते. घोडदळ वगळून फक्त पायदळासाठी एक स्वतंत्र सेनाप्रमुख होता पण

त्यांचा महाराजांच्या मंत्रिमंडळात समावेश नव्हता. स्वराज्याच्या सर्व सैन्यावर सेनापतींची हुकूमत चालत असे. त्यांना वार्षिक १० हजार होन पगार मिळत असे.

- **पंत सुमंत (डबीर) :** पंत सुमंत यांना स्वराज्याचे परराष्ट्र मंत्री होते. परराष्ट्रांना खलिते पाठविणे, परराष्ट्रांकडून आलेले खलिते घेणे, परराष्ट्रासंबंधात नियमितपणे महाराजांना माहिती आणि सल्ला देणे ही कामे आणि परराष्ट्रातून हेरांच्या साहाय्याने बातम्या काढण्याचे जबाबदारीचे काम त्यांना करावे लागे. रामचंद्र त्रिंबक हे पहिले पंत सुमंत असून त्यांना वार्षिक १० हजार होन पगार होता.
- **न्यायाधीश (काझी-उल-ऊझत) :** निराजीपंत रावजी हे स्वराज्याचे पहिले सरन्यायाधीश होते. दिवाणी व फौजदारी दोन्ही प्रकारच्या गुन्ह्यांबाबत खटले चालवून न्यायनिवाडा करून रयतेला न्याय देणे हे त्यांचे काम होते. त्यांना वार्षिक १० हजार होन पगार मिळत असे.
- **पंडितराव दानाध्यक्ष (सद्र-मुहतसिव) :** रघुनाथराव पंडित हे पहिले धर्मखात्याचे प्रमुख होते. दानधर्म करणे, पंडित, विद्वान ब्राह्मणांचा सन्मान करणे, यज्ञ करणे, नियमित चालणाऱ्या धार्मिक कार्याबाबत सल्ला देणे, शास्त्रार्थ पाहणे ही यांची कामे असत. त्यांना वार्षिक १० हजार होन पगार मिळत असे.

अशा प्रकारे हे अष्टप्रधान मंत्रीमंडळ असून राज्यकारभाराची निरनिराळी कामे या मंत्र्यांकडे सोपवली. ही मंत्रीपदे वंशपरंपरागत न ठेवता, कर्तबगारीवर व व्यक्तीचे गुणदोष पाहूनच ठरवण्यात येत.

**2. मुत्सद्दी राजा :**

सुरुवातीला अत्यल्प सैन्य असूनही गनिमी काव्याचा नियोजनबद्ध वापर करून त्यांनी शत्रूच्या विशाल सैन्याला नामोहरम केले. त्यांनी जिंकलेल्या लढाया त्यांच्या यशस्वी युद्धनीती आणि मुत्सद्दीपणाची साक्ष देतात. योग्य त्या वेळी आक्रमण किंवा गरज पडेल त्यावेळी तह हे सूत्र मुत्सद्दीपणे त्यांनी वापरले व अनेक शत्रूंना नामोहरम केले.स्वराज्यासाठीच्या लढाईत कुठेही फितुरी, दगाबाजी होणार नाही, यासाठी कडक शिस्त निर्माण केली. स्वराज्यांतर्गत कलह वेळीच मोडून काढला. भूगोल अर्थात भूप्रदेशाचे अचूक ज्ञान, आश्चर्यजनक वेगवान हालचालींसाठी सैन्याची काटेकोर रचना आणि बलाढ्य शत्रूंचे मनोधैर्य खच्ची करणारे नेमके हल्ले या सूत्राच्या आधारे त्यांनी अनेक लढाया जिंकल्या.त्यांची प्रत्येक लढाई ही संरक्षणशास्त्राच्या संशोधकांसाठी अभ्यसनीय आहे.

शिस्त, कर्तृत्ववानांचा सन्मान, न्याय व समानतेची वागणूक या नेतृत्वगुणांमुळे सैन्याबरोबरच तत्कालीन प्रजेच्या मनातही छत्रपती शिवरायांबद्दल आदर निर्माण झाला.त्यामुळे त्यांची प्रत्येक मोहिम यशस्वी ठरत गेली. शिवरायांनी रयतेच्या मनामध्ये स्वाभिमानाचा, पराक्रमाचा, स्वराज्यनिष्ठेचा हुंकार जागृत केला.

1. **शिक्षा व कठोर प्रशासन**

शिवाजी महाराजांनी स्वराज्यात स्त्रियांवर अन्याय, अत्याचार व हिंसाचार करणाऱ्यांना व त्रास देणाऱ्यांना कठोर शिक्षेची तरतूद केली होती. महिलांना त्रास देणाऱ्यांना शिवाजी महाराजांनी कडक शासन केल्याची अनेक उदाहरणे देता येतील. शिवाजी महाराजांच्या दरबारात सुनावणीसाठी आलेले प्रकरण तातडीने, समोरासमोर तडीस नेले जायचे. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात शेकडो गड-किल्ले होते. सर्व गड-किल्ल्यांचे कामकाज नेमकेपणाने चालायचे. नेमून दिलेल्या कामात केलेली हयगय महाराज खपवून घेत नसत.

3. **आरमाराची स्थापना**

महाराष्ट्राला शेकडो कि.मी.चा समुद्रकिनारा लाभला आहे. त्यामुळे शत्रू समुद्रामार्गेही हल्ला करू शकतो, हे शिवरायांनी नेमकेपणाने हरले होते. स्वराज्याच्या संरक्षणासाठी शिवाजी महाराजांनी आरमाराची स्थापना केली. ज्याचं आरमार, त्याचा समुद्र, असे धोरण शिवाजी महाराजांनी राबवले. कोकण किनारपट्टीवर अनेक जलदुर्ग उभारून स्वराज्याच्या सीमा संरक्षित केल्या. मायनाक भंडारी या समाजाला आरमाराची सुभेदारी दिली. विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, हे त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीकच मानायला हवेत.

**4. न्यायी राजा :**

एक न्यायी राजा म्हणून छत्रपती शिवरायांचे कर्तृत्व जगभरातील समस्त प्रशासकांसाठी प्रेरणादायी आहे. राजा किंवा प्रशासक हे प्रजेचे सेवक असतात, ही उच्च भावना बाळगून त्यांनी राज्यकारभार केला. आपल्या अधिपत्याखालील प्रदेशात त्यांनी उत्तम पद्धतीची शासन व्यवस्था व शांतता निर्माण केली. शेतकरी वर्गाच्या हितावह धोरणे आखली. नागरिकांना आवश्यक सुरक्षितता मिळवून दिली. शेतक-यांच्या भाजीच्या देठालाही हात लावू नये ही त्यांची आज्ञा आजही एका आदर्श प्रशासकाचे वचन म्हणून सुवर्णाक्षरांत कोरली गेली आहे. त्यांच्या उदार, सहिष्णू व लोककल्याणकारी धोरणांमुळे त्यांनी सामान्य रयतेच्या, शेतक-यांच्या, लढवय्या सैनिकांच्या मनात अढळ स्थान मिळवले. शिवराय हे सहिष्णू राजा होते. त्यांनी सर्व जातिधर्माच्या संतांचा सन्मान केला.

**5. वतनदारीकडून वेतनदारीकडे :**

शिवरायांनी महसूल वसुलीसाठी स्वतंत्र अधिकारी नेमले. वतनदाराकडून महसूल वसुलीचे काम काढले आणि त्यांचे अधिकार मर्यादित केले. शिवरायांच्या जबाबदार अधिकार्यांनी काळजीपूर्वक जमिनीची पाहणी करून मगदुरानुसार तिची बारा प्रकारात सुपीक व नापीक अशा क्रमाने प्रतवारी केली. हलक्या प्रतीच्या खडकाळ, पाणथळ जमिनीवर सुपीक जमिनीच्या तुलनेन

अत्यंत नगण्य कर आकारण्यात आला. माळरान व वांझट जमिनी करातून वगळण्यात आल्या. संपूर्ण महसूल सरकारी कोषात जमा करण्याचा दंडक केला. सरकारी अधिकायांच्या वर्तनावर नजर ठेवण्यासाठी हेर नेमले. त्यांच्या कामाची देखरेख करण्यासाठी आणि हिशोब तपासणीसाठी जिल्हा व प्रांत पातळीवर विशेष अधिकारी नेमले. राजांनी महसूल जमिनीवर न ठेवता पिकाच्या उत्पन्नावर ठेवला. नवीन वतने दिली नाहीत. मनमानी करणाया वतनदाराचे वाडे, हुडे, हवेल्या जमीनदोस्त केल्या आणि हिशेबात अफरातफर व शेतकयांची बेइज्जती करणाया अधिकायांना जबर शिक्षा केल्या.

**6. महसूल व अर्थव्यवस्था**

वतनासाठी वतनदारांचा रक्तरंजित संघर्ष सुरू असे. शिवरायांच्या आज्ञापत्रात याचा स्पष्ट उल्लेख आहे. ते म्हणतात : राज्यातील वतनदार, देशमुख व देशकुलकर्णी, पाटील आदिकरून यांस वतनदार म्हणावे, ही प्राकृत परिभाषा मात्र आहे. ते स्वल्पच परंतु स्वतंत्र देशनायकच आहेत. हे सरंजामदार राजसत्तेला जुमानत नसत, शत्रूशी हातमिळवणी करीत व रयतेचा छळ करीत. शिवरायांनी हे सर्व हेरले आणि त्यांनी शासन व्यवस्थेत बदल केले.

**सारांश :**

शिवाजी महाराज यांनी राज्याचे आणि संस्कृतीचे रक्षण केले, तर दुसरीकडे त्यांनी राष्ट्र उभारणीसाठी सर्वसमावेशक दृष्टिकोन समोर ठेवला. “छत्रपती शिवाजी महाराज हे त्यांच्या दूरदृष्टीमुळे इतिहासातील इतर राजांपेक्षा पूर्णपणे वेगळे होते. त्यांनी आपल्या शासन प्रणालीत योग्यता हाच निकष एखादे पद मिळवण्याचा आणि मिळवलेले पद टिकवण्याचा एकमेव निकष होता. यात जातपात, धर्म, नातेगोते याचा कसलाही संबंध येत नसे.

एस.एन.सेन म्हणतात, छत्रपती शिवाजी जगातील एक महान सेनापती होते. याविषयी दुमत असण्याचे कारण नाही; परंतु एक मुलकी प्रशासक म्हणून त्यांचे कर्तृत्व त्याहूनही अधिक निर्विवाद आहे. शिवरायांच्या या प्रशासन कौशल्य व मुत्सद्देगिरीबद्दल पाश्चात्त्यांनीदेखील गौरवोद्गार काढले आहेत. तत्कालीन इंग्रज वखारीतील अधिकायांकडून ब्रिटनच्या राजाला लिहिलेल्या पत्रामध्ये शिवाजी हे पूर्वेकडील ज्ञात जगातील सर्वश्रेष्ठ मुत्सद्दी आहेत असा निर्वाळा आहे, तर पोर्तुगीज व्हाइसरॉय त्याच्या राजाला लिहितो : जर मुत्सद्देगिरी व युद्धकौशल्य याबाबतीत तुलनाच करावयाची असेल तर फक्त अलेक्झांडर द ग्रेट किंवा ज्युलियस सीझर यांचीच तुलना शिवाजीसोबत होऊ शकते. ब्रिटिश व्हाइसरॉय लॉर्ड एल्फिन्स्टन म्हणतो : शिवाजी जर आमच्या देशात जन्मले असते तर पृथ्वीवरच काय, परग्रहावरही आमचे राज्य स्थापन केले असते. आजच्या अराजकाच्या स्थितीत छत्रपती शिवरायांच्या प्रशासन व्यवस्थेचा आदर्श घेऊन भारताला आदर्श राष्ट्र बनवणे काळाची गरज ठरते.

**संदर्भग्रंथ :**

1. बेंद्रे, वा. सी. श्री. छत्रपति शिवाजी महाराज, २ खंड, मुंबई, १९७२.
2. भावे, वा. कृ. युगप्रवर्तक शिवाजी महाराज, पुणे, १९५५.
3. शिवदे सदाशिव , “माराठ्यांची लष्करी व्यवस्था “, डायमंड पब्लिकेशन , पुणे , २०११
4. केळुसकर कृ.अ., “छत्रपती शिवाजी महाराज”, वरदा प्रकाशन, पुणे, २०१६
5. हर्षवर्धन पवार (जिल्हा माहिती अधिकारी, अमरावती), “छत्रपती शिवाजी महाराज : एक आदर्श प्रशासक” बेरार टाईम्स, अमरावती.
6. शहा. मु. ब. संपा. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य, खंड १ ते १३, धुळे, १९९५–१९९८.
7. शेलवलकर, त्र्यं. शं. श्री शिवछत्रपति : संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने, मुंबई, १९६४.